Prabhu Shri Ramchnadra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati

# Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

(NAAC Accredited With 'B' Grade)

# GEOGRAPHY DEPARTMENT

।। आनो भद्रा क्रतवो यन्तु विश्वतः ।।

# Departmental Activities

## Session :- 2018-19

# मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात

## भूगोल दिन साजरा

दि.१४ जाने. २०१९

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या भूगोल विभागाच्या वतीने दि. १४ जाने. २०१९ रोजी भूगोल दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून तत्वज्ञान विभागप्रमुख डॉ. वेदप्रकाश डोणगावकर, लोकप्रशासन विभागप्रमुख प्रा.विलास गायकवाड हे होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते  पृथ्वी गोलास पुष्पमाला अर्पण करून व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख प्रा.डि.एन.लांजेवार यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणातून भूगोल दिन आयोजना मागील हेतू स्पष्ट केला. तर प्रा.विलास गायकवाड यांनी भूगोल विषयाचा मानवी जिवनाशी कशाप्रकारे संबंध येत असतो. या विषयी मार्गदर्शन केले. डॉ. वेदप्रकाश डोणगावकर यांनी भूगोल दिन हा मकरसंक्रातीच्या दिवशी साजरा करतात कारण या दिवशी सूर्याच्या उत्तरायनास सुरुवात होते आणि दक्षिण गोलार्धात असणारे मकरवृत्त ओलांडून उत्तरगोलार्धाकडे सूर्याचे मार्गक्रमण होते. म्हणून मकरसंक्रांतीचा सण हा १४ जानेवारीला साजरा करण्याची परंपरा भारतात आहे. असे आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना सांगितले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी. एस. कुबडे यांनी भूगोल विषय मानवी जीवनाशी कसा निगडीत आहे ते उदारणासह स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन कु. वर्षा पायघन हिने केले तर पाहूण्याचे आभार कु.रुपाली खंदारे हिने मानले. महाविद्यालयातील बहूसंख्य विद्यार्थी कार्यक्रमास उपस्थित होते.




विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. वेदप्रकाश डोणगांवकर








भूगोल दिनाच्या कार्यक्रमात सहभागी विद्यार्थी

# भूगोल विभागाव्दारा चर्चासत्राचे आयोजन

## विषय – भूगोलशास्त्रातील विविध संकल्पना

**दिनांक** 16 फेब्रुवारी 2019

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील भूगोल विभागा द्वारा दिनांक 15 व 16 फेब्रुवारी 2019 रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगोल विभागाच्या अभ्यासक्रमाला अनुसरून बी. ए. भाग 1 सेम 2 बी.ए. भाग 2 सेम 4 व बी.ए. भाग 3 सेम 6 च्या विद्यार्थ्यांचे विभागाद्वारे चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. बी.ए. भाग 1 च्या विद्यार्थ्यांनी "नदी प्रणाली च्या कार्यातून निर्माण होणारे भूरूपे " बी. ए. भाग २ सेम. 4 च्या विद्यार्थ्यांनी "सागरशास्त्राचे मानवी जीवनात असणारे महत्त्व " तर बी.ए. भाग 3 सेमिस्टर 6 च्या विद्यार्थ्यांनी "महाराष्ट्रातील पर्यटन स्थळे या विषयावर अभ्यासक्रमाला अनुसरून आपले मुद्दे मांडलेत. सदर चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप लांजेवार हे होते. या चर्चासत्रामध्ये तृतीय वर्षाचे विद्यार्थी गोपाल करवते आणि अमोल नेहूल तसेच बी.ए. भाग २ सेम.4 ची विद्यार्थिनी कु. सिमा वैदय , तर बी.ए. भाग १ सेम.१ च्या कु. रेश्मा डुंगळे या विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयाला अनुसरून आपले मत मांडले. प्रामुख्याने विद्यार्थ्यांनी प्राकृतिक भूगोलाचा पर्यावरणाशी असणारा संबंध त्याचबरोबर भारतातील पर्यावरण याविषयी आपले मत मांडले शेवटी अध्यक्षीय समारोप करताना भूगोल विभाग प्रमुख प्रा. डी. एन. लांजेवार यांनी प्राकृतिक भूगोल व पर्यावरण शास्त्र यामध्ये असणाऱ्या संबंध पर्यावरणीय प्रदूषण व मानवी आरोग्य भारतातील पर्यावरण प्रदूषणाची कारणे या विषयाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.


सेमिनार
विषय :- भूगोल


सेमिनार
विषय :- भूगोल

# मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना

**दिनांक :- 27/09/2018**

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम च्या भूगोल विभागाद्वारा भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना दि 27/09/2018 रोजी करण्यात आली . सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. जी. एस. कुबडे हे होते. तर प्रमुख पाहूणे म्हणून श्री तुळशीरामजी जाधव महाविद्यालयातील इतिहास विभाग प्रमुख प्रा. संतोष इंगोले यांची उपस्थिती लाभली.तर प्रमुख उपस्थितामध्ये महाविद्यालयातील प्रा. विलास गायकवाड डॉ. पी.एस. पाथरकर डॉ. व्ही.ई डोणगावकर इतिहास विभाग प्रमुख प्रा. बि. आर. तनूपरे व श्री संजय गोटे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पुजनाने झाली कार्यक्रमाचे प्रास्ताविक भूगोल विभाग प्रमुख प्रा. दिलीप लांजेवार यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविकात भाषणातून अभ्यास मंडळ स्थापन करण्यामागील हेतू स्पष्ट केला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे प्रा. संतोष इंगोले यांनी आपल्या मार्गदर्शनातून अभ्यास मंडळ कसे असावे अभ्यास मंडळाच्या माध्यमातून कोणकोणते उपक्रम राबविले पाहीजेत तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यानी आपल्या सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी कशाप्रकारे महाविद्यालयातील उपलब्ध साधनसामूग्रीचा वापर करावा. या विषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य जी. एस. कुबडे यांनी ज्या विद्यार्थ्याची अभ्यास मडंळात निवड करण्यात आली आहे. त्यांना आपले अधिकार व कार्य काय असतील यावियषी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन प्रा बी. आर. तनपूरे यांनी केले. तर आभार कु. वर्षा [illegible] हिने व्यक्त केले कार्यक्रमासाठी इतिहास, भूगोल व अर्थशास्त्र विषयाचे बहूसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.


अर्थशास्त्र

# भूगोल व पर्यावरण अभ्यास सहल अहवाल

**दिनांक :- 25 फेब्रुवारी 2019**

शैक्षणिक सत्र 2018 19 या वर्षात भूगोल विभागाच्या वतीने भूगोल विषय व पर्यावरण अभ्यास विषयाच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहलीचे आयोजन 25 फेब्रुवारी 2019 रोजी चिखलदरा येथे करण्यात आले होते. दिनांक 25 फेब्रुवारी 2019 ला सकाळी 4 वाजता वाशीम येथून महाराष्ट्र राज्य वाहतूक महामंडळाच्या बसने चिखलदरा येथे जाण्यासाठी निघालो होतो. सकाळी 10 वाजता चिखलदरा येथे पोहोचलो. सातपुडा पर्वतात महाराष्ट्र व मध्य प्रदेश राज्याच्या सीमेवर असलेले हे ठिकाण नैसर्गिक सौंदर्य, दऱ्याखोऱ्या, धबधबे या नैसर्गिक घटकांना पाहण्याचा विद्यार्थ्यांनी आनंद घेतला. सातपुडा पर्वतातील थंड हवेचे ठिकाण म्हणून चिखलदरा हे प्रसिद्ध आहे. तसेच येथे नैसर्गिक विविधता व जैवविविधता मोठ्या प्रमाणात पहावयास मिळते हा प्रदेश मेळघाट व्याघ्र प्रकल्प म्हणून सुद्धा प्रसिद्ध आहे चिखलदरा येथे देवी पॉईंट, पंचगोल पॉईंट, सूर्यास्त पॉईंट, गार्डन, पवनचक्की या ठिकाणी विद्यार्थ्यांनी भेट दिली सायंकाळी 6 वाजता चिखलदरा येथून वाशिम साठी प्रस्थान केले व रात्री 12 वाजता वाशीम येथे पोहोचलो सदर सहलीमध्ये महाविद्यालयातील 30 विद्यार्थी व चार शिक्षकांनी सहभाग घेतला होता सहल प्रभारी प्रा. डी. एन. लांजेवार यांच्या मार्गदर्शनात सहल संपन्न झाली.







